# पुणे महानगरपालिका

## * स्थायी समिती *

## कार्यपत्रिका क्रमांक ६

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ११/५/२०२१** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### घनकचरा व्यवस्थापन आढावा

विषय क्र. १२५

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/४/२०२१ ते दि.३०/४/२०२१ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त घनकचरा व्यवस्थापन यांचे जा.क्र.घकव्यका/४२५ दि. ४/५/२०२१ चे पत्र.

### उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

विषय क्र. १२६

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ कार्यालयाचे नियंत्रणाखालील भवानी, बिबवेवाडी, कसबा–विश्रामबागवाडा, महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालयांकडील माहे फेब्रुवारी २०२१ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांचे जा.क्र. उआ–५/४४१ दि. ३०/४/२०२१ चे पत्र.

विषय क्र. १२७

क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरुड–बावधन क्षेत्रिय कार्यालयांच्या माहे मार्च २०२१ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/४७ दि.४/५/२०२१ चे पत्र.

### मा.सभासदांचे प्रस्ताव

विषय क्र. १२८

मा.अजय खेडेकर यांचे दि. ५/५/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र.१८ क मध्ये खालील विविध विकास कामे करण्यासाठी र.रू. १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अ.क्र. | अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| | सन २०२०–२१ चे अंदाजपत्रक, प्रभाग क्र १८ क मध्ये श्रीमंत भैरवसिंह घोरपडे उद्यान येथे ७ डी थिएटर उभारणे, बजेट कोड CE26A336/ SU1-1405 | १ कोटी | |
| | **नविन सुचविलेली कामे:** | | |
| १ | प्रभाग क्र. १८ क बचत गटातील प्रशिक्षक महिलांसाठी शिलाई मशिन वाटप करणे | | २० लक्ष |
| २ | प्रभाग क्र. १८ क फडगेट पोलिस चौकी परिसरात विविध विकास कामे करणे | | १० लक्ष |
| ३ | प्रभाग क्र. १८ क घोरपडे पेठ परिसरात पोस्ट ऑफिस जवळ विविध विकास कामे व तद्नुषंगिक कामे करणे | | १० लक्ष |
| ४ | प्रभाग क्र. १८ क मध्ये ड्रेनेज लाइन टाकणे व फरशी बसविणे व कॉंक्रिटीकरण करणे | | १० लक्ष |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | प्रभाग क्र. १८ क मध्ये विविध ठिकाणी शौचालय दुरूस्ती करणे | | १० लक्ष |
| ६ | प्रभाग क्र. १८ क विविध ठिकाणी साफसफाई करणे | | १० लक्ष |
| ७ | प्रभाग क्र. १८ क विविध ठिकाणी लोखंडी जाळया बसविणे | | १० लक्ष |
| ८ | प्रभाग क्र. १८ क मध्ये गजराज मित्र मंडळ परिसरात समाज मंदिर दुरूस्ती करणे. | | २० लक्ष |

माहितीसाठी आलेले विषय

विषय क्र. १२९

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि. १६/३/२०२१ ते दि.३१/३/२०२१ पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.४/४८ दि.४/५/२०२१ चे पत्र.

मागील सभेचे विषय

**विषय क्र. १३०**

मा.ॲड्.अब्दुल गफुर अ.पठाण, मा.सौ.परवीन शेख व मा.सौ.हमीदा सुंडके यांचे दि. १२/३/२०२१ चे पत्र.

स्थायी समिती दि. ९/३/२०२१ ठराव क्र. १४०९ फेरविचार करण्यात यावा व निरस्त करुन दप्तरी दाखल करण्यात यावा व स्थायी समिती ठराव क्र. १३०६ दि.२६/२/२०२१ रोजी करण्यात आलेला ठरावाची पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात यावी.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ५/४/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. १३१

मा.सौ.मंजुषा नागपुरे यांचे दि. १०/२/२०२१ चे पत्र.

पुणे पेठ वडगाव बुद्रुक स.न. १४ (पार्ट), १५ (पार्ट) (अपूर्वा मेडिकल ते क्राऊन बेकरी) मधून जाणारा रस्ता व पुणे पेठ वडगाव बुद्रुक स.न. १० (पार्ट) (खाडे गिरणी ते सनसिटी) मधून जाणारा रस्ता वाहतुकीच्या दृष्टीकोनातून अपुरा पडत आहे. सदर रस्ता रुंद करणे आवश्यक आहे. म्हणून हा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २१० (१) (ब) अन्वये रुंद करण्यात यावा.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ५/४/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. १३२

पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी रुग्णालये/नंर्सिग होम व्यवसायांना नोंदणी देताना व दिलेल्या नोंदणीचे विहीतमुदतीनंतर नुतणीकरण करताना सन २०२१-२०२२ या चालु आर्थिक वर्षापासुन शुल्क आकारणी करणेस खालील नमुद बाब क्र. १ ते ५ मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेस व बाब क्र. ६ ची अमंलबजावणी सन २०२१-२०२२ या चालु आर्थिक वर्षापासुन करणेकरीता मा.स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/९७१ दि. १६/३/२०२१ चे पत्र.

१) सुधारीत दराने परवाना फी व विलंब शुल्काची आकारणी दि.०१/०४/२०२१ पासुन करणेस.

२) दिलेल्या परवान्याचे नुतनीकरण परवान्याची मुदत सपुंष्टात आलेल्या वर्षाच्या पुढील तीन वर्षासाठी नुतनीकरण देणेस.

३) अधिसुचनेनुसार वार्षीक परवाना शुल्क/ फी आकारणी १ ते ५ खाटांसाठी रक्कम रु. ५०००/- व ५ पेक्षा जास्त खाटा असलेल्या शुश्रुषागृहाला पुढील प्रत्येकी ५ वाढीव खाटांच्या टप्यासाठी रक्कम रु. ५०००/- प्रति ५ खाटा प्रमाणे वाढीव शुल्क आकारणेस.

४) यापुर्वी सन २०२१ च्या पुढील कालावधीसाठी जुन्या दराने परवाना फी स्विकारुन नर्सिंगहोम परवाना नोंदणी व नुतणीकरण करुन दिलेल्या व्यवसायधारकांकडुन शासन अधिसुचनेत नमुद केलेल्या सुधारीत दराने होणारी परवाना फी ची फरक रक्कम वसुल करणेस.

५) शुश्रुषागृहाच्या दि. ०१/०४/२०२१ पासुन पुढील कालावधीसाठी नुतनीकरण करुन दिलेल्या आस्थापंनेस त्यांच्या पुढील कालावधीच्या नुतनीकरण कालावधीसाठी लगतचे मागील नुतनीकरण करुन देतेवेळी आकारण्यात आलेले

परवाना शुल्क + त्यावर २५% वाढीव शुल्कासह पुढील प्रत्येक तीन वर्षीय नुतनीकरणासाठी फक्त शुल्क/ परवाना फीची आकारणी करणेस.

६) परवाना नुतनीकरणासाठी विलंब झाल्यास संबधीत व्यवसायधारकांन कडुन विलंब फी खालील तक्त्यात नमुद केलेल्या सुधारीत दराने आकारणी करुन वसुल करणेस .

| प्रचलित पध्दत | | सुधारीत दराने आकारणी दि.०१/०४/२०२१ पासुन करणेस | |
|---|---|---|---|
| बेडस् संख्या | विलंब फी प्रतिमहिना | बेडस संख्या | विलंब फी प्रतिमहिना |
| १० बेडस् पर्यंत | रु.०५/- | ०५ बेडस पर्यंत | र.रु. ५०/- |
| १० बेडस्च्या पुढे | र.१०/- | ०६ बेडस पासुन पुढे | र.रु. १००/- |

७) नव्याने प्रथम परवाना देतेवेळी ज्या आर्थिक वर्षात संबधीत व्यवसायधारकाचा प्रस्ताव दाखल होवुन मान्यता मिळेल ते आर्थिक वर्ष धरुन एकुण तीन वर्ष कालावधीसाठी परवाना देणेस .

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ५/४/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १३३**

अग्निशमन सेवा पुरविणेच्या दरामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे दरवाढ करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अग्निशमन/७१ दि.२०/५/२०२० चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ५/४/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १३४**

पुणे महानगरपालिकेच्या चाळ विभागाकडील मनपा वसाहतीमध्ये राहणाऱ्या (रस्ता रुंदीकरण, पुरग्रस्त, गवनि पुर्नवसन व प्रकल्पबाधित) बिगर मनपा सदनिकाधारकांचे निवासी घरभाडे/लायसेन्स फी मध्ये भाडेवाढ करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सीएसओ/१३९३ दि.१८/२/२०१९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ५/४/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १३५**

**मा.सौ.अश्विनी पोकळे यांचे दि. ७/१/२०२१ चे पत्र.**

प्रभाग क्र.४२ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अ.क्र. | अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | सन २०२०–२१ चे अंदाजपत्रक बजेट कोड CE22A548 /SJ10-2520 महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान स.नं.१३ आंबेगाव बुद्रुक येथील परिसरामध्ये विविध विकासाची कामे करणे | १ कोटी | --- |
| | नविन सुचविलेली कामे | | |
| १ | प्रभाग क्र.४२ ब धायरी बेनकरवस्ती परिसरातील संभाजीनगर येथील अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे | --- | १० लाख |
| २ | प्रभाग क्र.४२ ब धायरी येथील उंब–या गणपती चौक ते भैरवनाथ मंदिर परिसरात रस्ता दुरूस्त व फर्निचर विषयक कामे करणे | --- | १० लाख |
| ३ | महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान स.नं.१३ आंबेगाव बुद्रुक येथील परिसरामध्ये विविध विकासाची कामे करणे | --- | १० लाख |
| ४ | महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान स.नं.१३ आंबेगाव बुद्रुक येथील परिसरामध्ये उर्वरित कामे करणे | --- | १० लाख |
| ५ | प्रभाग क्र.४२ ब धायरी गावठाण परिसरात विविध ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे | --- | १० लाख |
| ६ | प्रभाग क्र.४२ ब धायरी गावठाण येथे सुरू असलेल्या शिवसृष्टीचे उर्वरित काम पूर्ण करणे | --- | १० लाख |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | प्रभाग क्र.४२ ब धायरी गावामध्ये विविध ठिकाणी ब्लॉक बसविणे | --- | १० लाख |
| ८ | प्रभाग क्र.४२ ब डी एस के रोड चे उर्वरित काम करणे | --- | १० लाख |
| ९ | प्रभाग क्र.४२ ब समाविष्ट धायरी गावातील चावडी कटयाचे उर्वरित काम करणे | --- | १० लाख |
| १० | प्रभाग क्र.४२ ब पवळी चौक परिसरात ड्रेनेज विषयक कामे करणे | --- | १० लाख |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ५/४/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. १३६

आरोग्य कार्यालयाकडील विविध विभागामार्फत सद्याच्या आकारण्यात येणारे प्रस्तावित मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या शुल्क दरात वाढ करून प्रस्तावित केलेल्या शुल्क दि.०१/०४/२०२१ पासून आकारणीस करण्यास मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१००७ दि.२२/३/२०२१ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ५/४/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. १३७

पुणे महानगरपालिकेकडील कायदेशीर दस्तऐवजाचे मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे मसुदा फीमध्ये वाढ करणेकामी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची खालीलप्रमाणे मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विधी विभाग/१००८ दि.२२/३/२०२१ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ५/४/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. १३८

मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेत्या यांचे दि. २०/४/२०२१ चे पत्र.

पुणे शहरात कोरोनाचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत आहे. तसेच रेमडिसिवर इंजेक्शन (injection) तुटवडा मोठ्या प्रमाणात भासत आहे. पुणे जिल्हा परिषद रेमडेसिविर इंजेक्शन(injection) थेट कंपनीकडुन खरेदी करते. पुणे महानगरपालिकेने सुद्धा रेमडिसिवर (injection) इंजेक्शनसाठी १ कोटीची निविदा काढली आहे. तरी सद्याची परिस्थिती पाहता पुणे महानगरपालिकेने देखील पुणे जिल्हा परिषदप्रमाणे रेमडिसिवर (injection) इंजेक्शन थेट कंपनीकडुन खरेदी करावी.
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. २७/४/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. १३९

पुणे पेठ शिवाजीनगर डेक्कन जिमखाना प्लॉट नं.७५९/५ ही पुणे महानगरपालिकेने भाडेतत्वावर घेतलेली मिळकत शाळेची इमारत धोकादायक झालेली असल्याने बंद आहे. यास्तव सदर मिळकत मूळ मालक ट्रस्टी डेक्कन जिमखाना यांना परत करणेस मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्यसभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माल.व्यव/१०१८,दि,२२/०३/२१ रोजीचे पत्रावर झालेला शहर सुधारणा समितीचा ठराव क्र.१८६,दि.२६.०३.२०२१ विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. २७/४/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. १४०

पुणे महानगर परिवहन महामंडळाचे सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील संचलन तूट बाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२०९९ दि. १०/२/२०२१ ने केलेला लेखापरिक्षण अहवाल विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. २७/४/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

संकीर्ण

विषय क्र. १४१

पुणे पेठ पाषाण येथील मासेमारी तलाव ठेकेदार प्रियदर्शनी मच्छीमार सहकारी मागासवर्गीय संस्था मर्यादित यांस दि. ७/५/२०१५ ते २८/२/२०१८ या मासेमारी मक्त्याचे जलपर्णी असल्यामुळे मासेमारी बंद असल्याने सदर कालावधीतील ३४ महिन्याचे भाडे र.रु. ९,३७,८२२/- माफ करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/४१ दि.३/५/२०२१ चे पत्र.

विषय क्र. १४२

पुणे महानगरपालिका झोन क्र.३ अंतर्गत धनकवडी सहकारनगर कार्यालयांचे अंतर्गत (१) श्रीशिवाजी मराठा संस्थेचे मुलांचे वसतीगृह तळजाई पायथा,पुणे. (२) श्रीमती लक्ष्मीबाई हजारे मुलींचे वसतीगृह आंबेगाव बु.पुणे. (३) पुणे विद्यार्थी गृहाचे मुक्तांगण इंग्लिश स्कुल, अरण्येश्वर,पुणे. (४) गेणुजी बेलदरे मनपा शाळा, जांभुळवाडी रोड, पुणे. (५) अभिनव इंग्लिश स्कुल,स.नं.१३,कात्रज बायपास रोड, आंबेगाव बुद्रुक,पुणे-४६ येथे स्थापित करण्यात आलेल्या आयसोलेशन/क्वारंटाईन/अवॅटेड केंद्र येथे दररोज दाखल होणाऱ्या नागरिकांना दैनंदिन दुपारचा चहा,लहान मुलांसाठी दुध व बिस्कीट गरजेनुसार बिस्लरी पाणी बॉटल पुरविणे इत्यादी कामे, अवॅटेड सेंटर उभारणेकरिता इमारती/रुममधील सामान हलविणे, स्थापत्य विषयक कामे करणे व काही वस्तु (सन २०१९-२० च्या शेड्युल मान्य दराने आणि काही वस्तु सरळ बाजारातुन रास्त दराने) खरेदी करुन पुरविणे इत्यादि कामे ठेकेदार मे. कृष्णा कंस्ट्रक्शन (प्रोप्रा. कृष्णा माळी) यांचेकडून दि.०९/०४/२०२० पासून दि. ०९/०२/२०२१ पर्यंत करुन घेण्यात आल्याने तसेच अवॅटेड सेंटर येथील साफसफाई ठेकेदार मे. शारदा सर्व्हिसेस यांचेकडून दि. २३/०४/२०२० पासून दि.३०/०७/२०२० पर्यंत ही कामे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) अन्वये एकुण र. रु. १,८४,६०,४१०.४७ पर्यंत करुन घेण्यात आल्याने सदर बाबीस मा. महापालिका आयुक्त यांची मान्यता मिळाली असून सदर बाब मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभा यांचे पश्चात माहितीसाठी व अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.३/५१ दि.४/५/२०२१ चे पत्र.

विषय क्र. १४३

मनपाचे घनकचरा वाहतुक करणेचे कामकाजामध्ये वाहनांअभावी अडचणी निर्माण होऊ नये म्हणून या कामाची नवीन निविदा मान्य होईपर्यंतच्या कालावधीसाठी निविदा क्र. २०९/२०१५-१६ DOOR TO DOOR SEGREGATED GARBAGAE COLLECTION BY PRIMARY AND SECONDARY TRANSPORTATION BY 7 TON GVW AND 1.5 TON GVW CAPACITY BELL TIPPER/TRUCK & TRANSPORTATION TO TRANSFER STATIONS, SWM PROJECT WITH OPERATION & MAINTENANCE OF PMC'S OWN AND CONTRACTORS VEHICLES For 3+2 YEARS या निविदेस पाचवे वर्षामधील मान्य दरानुसार र.रु.९,००,००,०००/- नवीन निविदा मान्य होईपर्यंत प्रत्यक्ष होणाऱ्या रक्कमेपर्यंत काम करुन घेणेकामी मुदतवाढ मिळणेस व त्यानुसार करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मोवावि/५० दि.४/५/२०२१ चे पत्र.

विषय क्र. १४४

केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत सार्वजनिक खाजगी भागीदारी(PPP) तत्वावरील प्रकल्पांसाठी केंद्र सरकारने निर्गमित केलेल्या प्रतिकृतीपैकी (MODEL) प्रतिकृती क्र.५ पुणे महानगरपालिका स्तरावर पुणे महापालिकेच्या HDH/EWS आरक्षित मिळकतींवर तसेच जिल्हाधिकारी यांनी उपलब्ध करून दिलेल्या शासकीय, गायरान जमिनीवर राबविणेसाठी खालील बाबीस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प्र.मं.आ.योजना/५३ दि.४/५/२०२१ चे पत्र.

१) मौजे फुरसुंगी गट क्र.८२, मौजे लोहगाव गट क्र. ३५ या शासकीय गायरान जमिनी व पुणे महानगरपालिकेच्या मौजे बालेवाडी स. नं. ४४, ४५ मौजे बालेवाडी स. नं ४९ , ५० मौजे बाणेर स. नं १२ पै मौजे कोंढवा बुद्रुक स. नं. ४३ /१ /ब,४४, ४५ /१ धानोरी स. नं. ७/१, ७/२ या जमिनीवर प्रधानमंत्री आवास योजना सर्वांसाठी घरे २०२२ अंतर्गत घटक क्र. ३ साठी शासन निर्णय क्र. -प्रआयो /२०१७/प्र.क्र.१२/ गृनिधो.-२ (सेल), शिकाना दि. ११ जानेवारी २०१८ नुसार खाजगी भागीदारी तत्वावरील प्रतिकृती क्र. ५ राबविणेस.

२) उपरोक्त नमूद मिळकतींवर घटक क्र. ३ अंतर्गत खाजगी भागीदारी तत्वावरील प्रतिकृती क्र.५ राबविणेकरिता विकसकांकडून मागणी प्रस्ताव(Request for Proposal ) मागविणेस.

३) यशस्वी विकासकासोबत जमीन हस्तांतरणाचा व इतर अनुषंगिक करार करणेस

४) प्रधानमंत्री आवास योजना सर्वांसाठी घरे २०२२ अंतर्गत प्रतिकृती क्र. ५ राबविणेकामी सर्वाधिकार मा. महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस.

शिवाजी दौंडकर

नगरसचिव,

पुणे महानगरपालिका.

(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)